# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.11.2024** **वार – मंगळवार**

---

**संविधान दिन**

भारतीय संविधान दिनानिमित्त आज पुण्यातील सरकारी कार्यालयं आणि शिक्षण संस्थांमध्ये संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले त्याचबरोबर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचं आयोजनही करण्यात आलं होतं. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं भारतीय संविधानावर आधारित प्रबोधनात्मक गीतांचा कार्यक्रम आणि सन्मान संविधानाचा या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यापीठात संविधान दिन मोठ्या दिमाखात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारती जवळील संविधान स्तंभाजवळ माननीय कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्यासह विद्यापीठातील अनेक मान्यवर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संविधान उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं.

त्यानंतर विद्यापीठामध्ये संविधान जनजागृतीसाठी फेरी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी पथनाट्ये सादर केली. त्यानंतर संविधानाचे अभ्यासक आणि कायदा आयोगाचे सदस्य डॉ. डी. एन. संदानशिव यांनी 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**26/11**

मुंबईमधील 26/11 हल्ल्यात हौतात्म्य आलेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचा-यांना आज पुणे पोलीस दलासह पुणेकरांनी मानवंदना दिली. हुतात्मा सैनिकांच्या शौर्याचं प्रतीक म्हणून उभारलेल्या स्तंभाला बँडच्या साथीने मानवंदना देत त्यांच्या हौतात्म्याला पुणे पोलिसांनी सलाम केला. पोलिसांसह 6 हजार शालेय विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या माध्यमातून शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली.

**आळंदी यात्रा**

आळंदी यात्रेनिमित्त राज्यभरातून लाखो भाविक आळंदीत दाखल झाले आहेत. आज कार्तिकी एकादशीची पहाटपूजा, समाधीवर पवमान अभिषेक आणि दुधारती वेदघोषात संपन्न झाली. यंदा माऊलींच्या पहाटपूजेचा मान हा नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील शिंपी टाकळी या गावच्या लोखंडे या दाम्पत्याला मिळाला.

**समता पुरस्कार**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे दिला जाणारा 'महात्मा फुले समता पुरस्कार' यंदाच्या वर्षी प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते नागराज मंजुळे यांना जाहीर झाला आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष आमदार छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली येत्या गुरुवारी हा पुरस्कार प्रदान समारंभ होणार आहे. एक लाख रुपये, फुले पगडी, मानपत्र, शाल आणि स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे; अशी माहिती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पुणे विभागीय अध्यक्ष प्रीतेश गवळी यांनी आज पुण्यात दिली.

**अत्रे पुरस्कार**

किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे पुरस्कृत त्यांच्या आई-वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणारा 'आबासाहेब अत्रे पुरस्कार' यंदा बालमानसशास्त्राच्या अभ्यासिका आणि तसेच पुण्यातील गरवारे बालभवनच्या माजी संचालिका शोभा अनिल भागवत यांना मरणोत्तर जाहीर झाला आहे. तर 'इंदिरा आबासाहेब अत्रे पुरस्कार' पिरंगुट जवळील संस्कार प्रतिष्ठान संचालित मतिमंद मुलांची निवासी शाळा आणि प्रौढ मतिमंदांसाठी निवासी शेती प्रकल्प राबविणारे उल्हास केंजळे आणि प्रतिभा केंजळे या दांम्पत्यास देण्यात येणार आहे. हे पुरस्कार वितरण 30 नोव्हेंबर रोजी होणार आहे.

**क्रीडा केंद्र**

क्रीडा भारतीच्या वतीनं पुण्यात नुकतंच दोन क्रीडा केंद्रांचं उद्घाटन करण्यात आलं. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या भावे हायस्कूलमध्ये आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत ही क्रीडा केंद्र सुरू करण्यात आली आहेत. या क्रीडा केंद्रामध्ये मलखांब, क्रिकेट, कबड्डी आणि बाल क्रीडांगण अशा चार खेळांचा समावेश आहे. अर्जुन पुरस्कार विजेत्या शकुंतला खटावकर, क्रीडा भारतीचे अध्यक्ष शैलेश आपटे यांच्या पुढाकाराने ही क्रीडा केंद्र सुरू करण्यात आली आहे. शालेय जीवनातच मुलांना खेळाची आवड निर्माण व्हावी हा यामागचा उद्देश आहे.

**पुणे मॅरेथॉन**

यंदाची 38 वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा डिसेंबरच्या पहिल्या रविवारी म्हणजे एक डिसेंबर रोजी होत आहे. अशी माहिती स्पर्धेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष एडवोकेट अभय छाजेड यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. पहाटे तीन वाजता सणस मैदानावर स्पर्धेला प्रारंभ होईल. यामध्ये महिला आणि पुरुष पूर्ण मॅरेथॉन, अर्ध मॅरेथॉन याबरोबरच दहा सात आणि तीन किलोमीटर तसंच व्हीलचेअर मॅरेथॉन इत्यादि स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेत देशभरातून 8000 धावपटू सहभागी होणार असून 70 परदेशी धावपटूंचाही सहभाग असेल. स्पर्धेतील विजेत्यांना पुणे महापालिकेकडून 35 लाख रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात सकाळच्या वेळी गारठा वाढू लागला आहे. आज पुन्हा किमान तापमानात घट होऊन किमान तापमान 10 पूर्णांक 8 दशांश अंश सेलसीयस नोंदवलं गेलं. उद्याही आकाश मुख्यतः निरभ्र राहून सकाळी धुकं पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. उद्या कमाल तापमान 28 आणि किमान तापमान 10 अंश सेलसीयसच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**